## बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग

क्र.इओए/एक/ओडी/348 दिनांक 05.11.2020

## प रि प त्र क

विषय - नैमित्तिक रजा (Casual Leave) प्रमाणात (Proposhnet) उपभागोण्याबाबत.

कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून, दिनांक 22 मार्च 2020 पासून घोषित केलेल्या लॉकडाऊनच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व कामगार/कर्मचारी/अधिकारी यांची दैनंदिन उपस्थिती माहे सप्टेंबर-2020 पर्यत टक्केवारीनुसार करणेकरिता वेळोवेळी महापलिकेद्वारे परिपत्रके पारित करण्यात आले होते तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिका कामगार/कर्मचारी/अधिकारी यांची दैनंदिन उपस्थिती ही 100% करण्यात आलेली असून त्यानुसार सद्य:स्थितीत सर्व कर्मचारी/अधिकारी कार्यालयात उपस्थित राहत आहेत.

परंतु, बृहन्मुंबई महानगरपालिकामधील शिक्षण खात्यातील कामगार/कर्मचारी/अधिकारी यांना मनपा सेवानियमावलीनुसार त्यांच्या वैयक्तिक कामकाजाकरिता कॅलेडंर वर्ष प्रमाणे 15 नैमित्तिक रजा (Casual Leave) अनुज्ञेय असल्याने सदर नैमित्तिक रजा संबंधित कामगार/कर्मचारी/अधिकारी हे उपभोगत असतात.

तथापि, शिक्षण खात्यातील कार्यरत कामगार/कर्मचारी/अधिकारी यांचे उपस्थिती पट पडताळले असता, बहुतांशी कार्यरत कामगार/कर्मचारी/अधिकारी यांच्या अधिका-अधिक प्रमाणात नैमित्तिक रजा शिल्लक असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तथापि, सन-2020 वर्षातील माहे नोव्हेंबर-डिसेंबर शिल्लक असल्याने शिक्षण खात्याच्या अखत्यारित कार्यरत असलेले कामगार/कर्मचारी/अधिकारी यांनी सदर महिन्यामध्ये नैमित्तिक रजा (Casual Leave) उपभोगताना प्रमाणात (Proposhnet) घेणे. कारण कि, कदाचित एखाद्या विभाग/उपविभाग कार्यालयातील अधिका-अधिक कामगार/कर्मचारी/अधिकारी यांनी एकाचवेळी नैमित्तिक रजा (Casual Leave) उपभोगल्यास कार्यालयीन कामकाजामध्ये अडचण निर्माण होऊन कार्यालयीन कामकाज प्रलंबित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब, याद्वारे सर्व कामगार/कर्मचारी/अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, सन-2020 वर्षातील माहे नोव्हेंबर-डिंसेबर मध्ये नैमित्तिक रजा (Casual Leave) उपभोगताना प्रमाणात (Proposhnet) घेणे जेणेकरुन कार्यालयीन कामकाजामध्ये व्यत्यय निर्माण होऊन, कार्यालयीन कामकाज प्रंलबित राहणार नाही. तसेच सदर कामगार/कर्मचारी/अधिकारी हे नैमित्तिक रजा (Casual Leave) प्रमाणात (Proposhnet) उपभोगत आहेत कि नाही ? याची खातरजमा संबंधित पर्यवेक्षणीय अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे.

सदर परिपत्रकाची नोंद घेऊन, परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे

M Palkar 5/11/2020

**शिक्षणाधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**

प्रत कार्यवाहीकरिता अग्रेषित

1. उपशिक्षणाधिकारी (मध्यवर्ती)/म.ख.खा./शाळा पायाभूत कक्ष/स.शि.अ./खा.प्रा.शा./माध्यमिक
2. प्रशासकीय अधिकारी (                )
3. शिक्षणाधिकारी मुख्य कार्यालयातील उपविभाग

5/11

**उपशिक्षणाधिकारी (मध्यवर्ती)**

Scanned with CamScanner